
- वर्ष:६वे
- अंक: ७ वा
- जुलै२०२१
- किंमत: ४० रूपये


मासिक

# शिक्षणयात्री



## शाळा बंद शिक्षण सुरू!


शाळा बंद शिक्षण सुरू!

## संवाद...



सुभाष कुलकर्णी
संपादक

गेल्या दिड वर्षापासून कोरोना विळखा घालून बसलाय. सोडता सोडत नाहीये. पहिली लाट, दुसरी लाट आता तिसरीही ! काय म्हणावं नि काय करावं? समजतच नाहीये. उद्योग धंद्यांचं नुकसान सहन करू हो, मात्र मुलांच्या शिक्षणाचं काय?

खरंच, मुलांच शिक्षणाचं नुकसान न भरून येणारं. कितीही नि कसाही आटापीटा करून परिक्षा पास झाल्याचं समाधान असलं तरी नूकसान झालय हे वास्तव.

शाळा बंद. घरीच ऑनलाईन वर्ग ज्यांचेकडे मोबाईल आहे ते आभासी वर्गात हजर. मात्र ज्यांचेकडे मोबाईल नाही त्यांचे काय? नुकसान दोघांचे होतेय. आशय समजत नाही. उमगत नाही. केवळ औपचारीकता ठरायला लागलीय ऑनलाईन वर्गांची.

अशावेळी मुलांपर्यंत प्रत्यक्ष पोहचणाऱ्या हातांना सलाम करायला हवा. खेड्या-पाड्यावरील मुलांपर्यंत पोहचून त्यांचा अभ्यास घेतला जातोय. उजळणी केली जातेय. कुणी झोपडीत तर कुणी शेतात, कुणी मंदिरात तर कुणी मोकळ्या जागेत मुलांना बसवून शिकवताहेत.

आता विद्यार्थी-पालक साऱ्यांनीच शाळा उघडा अशी हाक दिलीय. मुलेही बोअर झालीत. मज्जा नाही कि गमती नाही. खेळ नाही. नव्या पुस्तक-वह्यांचा आनंद नाही.

सरतील हे ही दिवस. होतील शाळा सुरू मात्र तो पावेतो असाच अभ्यास चालू ठेवूयात. ऑनलाईन-ऑफलाईन !

# अंतरंग


परिक्षा, पदवी,शिक्षण गोंधळात गोंधळ
डॉ.विजय पांढरीपांडे / ३

आभास आणि वास्तव
डॉ.शिरीष चौडणकर / ६

विद्यार्थ्यांचं कुतूहल जपणारा गुरूजी
युवराज माने / ९

शिक्षकमित्रांच्या मदतीने
प्रभाकर कचरे / १२

मोबाईल वरची शाळा?
सचिन अभंगे / १४

शिक्षणाची वारी विद्यार्थ्यांच्या दारी
प्रतिभा सुरेश सोनवणे/ १६

शिक्षण व शिकणे
सुरेश कुवर / १८

पूनश्च हरिओम
मनोहर चौधरी / २०

धन्य ते बेडेकर विद्यामंदीर
मीना अभ्यंकर/ २२

माझे जीवन कौशल्य
मनोहर चौरे / २४

ताठरणारी बकरी
डॉ.नंदा हरम / २६

माझी कविता
बा.स.जठार
राठोड गुरूजी
मनोज वनमाळी
जानकी गोरे



समृद्ध शिक्षण संस्कारासाठी ...

मासिक शिक्षणयात्री

।। ज्ञानम् सर्वजण हिताय ।।

वर्ष : ६वे अंक: ७ वा जुलै २०२१

**वार्षिक:रू.४००/-** **द्वैवार्षिक:रू.७००/-**
**त्रैवार्षिक:रू.१०००/-**

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.
**Online** पेमेंट साठी – खाते नाव–शिक्षणयात्री Shikshanyatri
बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No.13320200000322
IFSC Code : BARB0SHIRPU
वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे
संपर्क पत्ता– संपादक शिक्षण यात्री
क्रांतीनगर मु.पो.ता.–शिरपूर जि–धुळे ४२५४०५
(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)



मार्गदर्शक
मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

मानद संपादक
सुभाषदादा कुलकर्णी

उप संपादक
संदेश नंदकिशोर हजारे

संपादन सहाय्य
डॉ.दिपक बाविस्कर
डॉ.युवराज पवार

अंक जुळणी
प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

मुद्रितशोधन
डॉ.युवराज पवार

मुखपृष्ठ
जि.प.शाळा जातोडे ता.शिरपर जि.धुळे

कार्यालय प्रमुख
जगदीश पाटील

**प्रतिनिधी सहाय्य**
**पुणे-** रमेश काळे,
**मुंबई-** जयपाल गिरासे,
**नाशिक-**किरण पाटील,
**सोलापूर-** उमेश काळे,
**औरंगाबाद-** रवि गारूडकर,
**परभणी-** युवराज माने,
**जळगांव-** प्रविण माळी,
**नंदुरबार-** तुकाराम धनगर,
**अमरावती-** रूपेश माने,
**कोल्हापूर -** गुलाब बिसेन,
**सातारा -** विनोद भोजने,
**बीड -** अनंत दिक्षित,
**लातूर -** पंढरीनाथ चिभडे,

**लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत.**

समजूनही ना समज !

# परिक्षा, पदवी, शिक्षण.. गोंधळात गोंधळ!

> “ २०२०,२०२१ साली पदवी घेतलेले इंजिनीअर्स, डॉक्टर्स, कोणत्या दर्जाचे असतील? फोनवर बोलताना माझ्या एका ज्येष्ठ डॉक्टर मित्राने सांगितले की सर्जरीत एम एस करणाऱ्या पदव्युत्तर डॉक्टर ने एकही सर्जरी केली नसणार.किंवा नेत्र तज्ञा ने एकही डोळ्याचे ऑपरेशन केले नसणार या करोना काळात! पण कसेतरी गुण सूत्र वापरून त्यांना एम. एस.,किंवा एम. डी. ची पदवी मिळणार. ”



डॉ.विजय पांढरीपांडे
हैद्राबाद

बरीच चर्चा झाल्यानंतर अखेर दहावी,बारावी च्या निकालाचे निर्णय,निष्कर्ष जाहीर झालेत.हे निकष नीट बघितल्यास सहजलक्षात येते की मुलांना 'कसेतरी' पास करायचे आहे.कसेतरी वर ढकलायचे आहे.कसेतरी निकाल लावायचे आहेत.हे कसे तरीचे धोरण आता शाळा,कॉलेज, विद्यापीठ, सगळीकडेच पसरले आहे.जास्तीत जास्त गुण असलेले तीन विषयच गृहित धरायचे, ड्रॉईंग चे गुण वेगळे द्यायचे, नापास होत असतील तर पाच,दहा जादा (ग्रेस) गुण द्यायचे, प्रॅक्टिकल, होमवर्क च्या नावाखाली गुण उधळायचे असे हे सैल धोरण आहे.याचा अर्थ करोना नव्हता तेव्हा सर्व काही ऑल वेल होते का?तर तसेही नाही.अनेकांना बोर्डात शंभर टक्के गुण मिळतात. आताही मिळतील. नव्वद टक्के च्या वर गुण मिळवणाऱ्या हुशार, प्रतिभावंत विद्यार्थ्यांची संख्या तर लक्षणीय असते! एकूणच विद्यार्थ्यांची गुण पत्रिका अन त्यांची प्रत्यक्ष बुद्धीमत्ता याचा अर्थाअर्थी संबंध नसतो हे उघडे गुपित आहे.म्हणूनच या परिक्षेवर अवलंबून न राहता पुन्हा प्रवेश परीक्षा घ्याव्या लागतात.या प्रवेश परीक्षा म्हणजे लाखो, करोडो चा आर्थिक व्यवहार असतो. त्या मागे ट्युशन इंडस्ट्री चे छुपे पाठबळ असते ते वेगळे! हे राक्षस आपणच निर्माण केले आहेत. प्रश्न फक्त दहावी,बारावी च्या बोर्डा पुरताच मर्यादित नाही.बी.एस्सी.,एम.एस्सी.,बी.ई.,एम ई,एम.बी.बी.एस. अशा उच्च शिक्षण क्षेत्रात परीक्षेचे, मूल्यमापनाचे कितीतरी अंग असतात.प्रॅक्टिकल, tutorial, मिनी प्रोजेक्ट, फायनल इअर चे प्रोजेक्ट, त्यावर प्रबंध लेखन...गेल्या दोन वर्षात या सर्व क्षेत्रात आनंदी आनंद आहे!खरे तर पहिल्या सहा महिन्यात करोना ने जे काही शिकवले त्यापासून आपण तातडीने सावध व्हायला हवे होते.नवे पर्याय शोधायला हवे होते.म्हणजे शंभर टक्के परिणाम कारक नसले तरी बरेच काही साध्य करणे शक्य होते.पण तेव्हा शिक्षक,

प्राध्यापक,विद्यापीठ प्रशासन सुस्त होते.बेफिकीर होते.लॉक अन लॉक ची अनिश्चीतता,रोजच्या रुग्णाच्या मृत्यू आकड्यांची भीती, वाढत्या रोग प्रसाराचा सामना करण्यासाठी असमर्थ असलेली दूर्बळ आरोग्य यंत्रणा, शासन व्यवस्थेतील गलथानपणा, निर्णय घेण्यात अक्षम असलेले प्रशासन, याचा एकत्रित परिणाम म्हणजे शिक्षण क्षेत्राला सध्या आलेली मरगळ! नवे तंत्रज्ञान वापरायचे तर त्यासाठी आवश्यक स्किल्स, इंटरनेट बँड विड्थ, खेड्यापाड्यात स्मार्ट फोन, लॅपटॉपची कमी ,या अडचणी मुळे आपण मागे पडलो. सरकार अत्यावश्यक आरोग्य सुविधाचा विचार करणार की दुय्यम गरजेच्या शिक्षणा कडे लक्ष देणार ?तसेही आग लागल्यावर विहीर खोदण्याचे आपले धोरण.त्यामुळे सगळे स्वस्थ बसले.वास्तविक पाहता डेडिकेटेड टी वी चॅनल च्या माध्यमातून बरेच काही शक्य होते.स्टुडिओ मध्ये सर्व अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असते.तसेही खाजगी चॅनल्स ना फारसे काही काम नव्हते.काही एन जी ओ, उद्योग समूह,यांच्या मदतीने अन तज्ञा च्या सहाय्याने शाळांसाठी वेगळे,पदवी साठी वेगळे, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वेगळे ,असे शिक्षणाला वाहिलेले चॅनल्स आपण निर्माण करू शकलो असतो.

या यंत्रणे द्वारे उत्तम प्राध्यापक, तज्ञांची मदत घेऊन लेसन प्लॅन करता आले असते, प्रॅक्टिकल दाखवता आले असते. कोरोनाचे नियम पाळून टीव्ही स्टुडिओत ते शक्य होते.पण ते कुणाला सुचले नाही. त्याची गरज भासली नाही.रटाळ त्याच त्या बातम्या, वायफळ चर्चा चे गुऱ्हाळ चालवणाऱ्या न्यूज चॅनेलचे स्लॉट वापरता आले असते.एक नवा व्यवसाय म्हणून देखील त्याकडे पाहता आले असते.कारण पारंपरिक व्यवसायात तशीही आणीबाणी आली आहे. २०२०,२०२१ साली पदवी घेतलेले इंजिनीअर्स, डॉक्टर्स, कोणत्या दर्जाचे असतील? फोनवर बोलताना माझ्या एका ज्येष्ठ डॉक्टर मित्राने सांगितले की सर्जरीत एम एस करणाऱ्या पदव्युत्तर डॉक्टर ने एकही सर्जरी केली नसणार.किंवा नेत्र तज्ञा ने एकही डोळ्याचे ऑपरेशन केले नसणार या करोना काळात! पण कसेतरी गुण सूत्र वापरून त्यांना एम. एस.,किंवा एम. डी. ची पदवी मिळणार.तीच कथा इंजिनीअर्स ची. फायनल वर्षाच्या प्रोजेक्ट ला बरेच गुण असतात .तिथे काहीतरी कॉपी पेस्ट करून,काहीतरी सबमिट करून, कशीतरी तोंडी परीक्षा घेऊन, विद्यार्थ्यांना दे धक्का म्हणून ढकललं आहे. प्रयोगशाळा बंद,त्यामुळे प्रॅक्टिकल झालेलेच नाहीत.झाले ते घाटावरचे श्राद्ध उरकल्या सारखे ! जे शिक्षणच प्रॅक्टिकल अनुभवावर, प्रॉब्लेम सोलविंग वर अवलंबून असते त्या कोर्सच्या पदव्या करोना कृपेने सर्रास दान करण्यात आल्या.याचा परिणाम पुढे करियर वर, उद्योग क्षेत्रावर,व्यवसायिक आलेखावर न झाला तरच नवल! संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यां बद्दल तर न बोललेच बरे. आधीही सगळे काही ऑल वेल होते असा दावा नाही. गेल्या तीन चार दशकात विद्यापीठाच्या संशोधनाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावर पार घसरला आहे.अगदी आय आय टी सारख्या संस्थांत देखील ७०-८० च्या दशकात पी एच डी चे जितके कडक नियम होते,ते तसे राहिले नाहीत हे परीक्षक या नात्याने मी अनुभवले आहे.कट,कॉपी पेस्टचा जमाना आला आहे. संशोधनात, नाविन्याचा, ओरिजिनल योगदानाचा अभाव दिसून येतो. अनेकांच्या चोऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर पकडल्या गेल्या आहेत.मी अनेक मुलाखती घेतो.त्यात एक निरीक्षण असे की प्रबंध लिहून पदव्या घेतलेले

विद्यार्थी, मुलाखतीच्या वेळी तो प्रबंध आणतच नाहीत.दाखवतच नाहीत.एरवी आमच्या काळात,प्रत्येक मुलाखतीच्या वेळी आम्ही आमचे प्रबंध,रिसर्च पेपर्स आधी दाखवत असू अभिमानाने! आता उमेदवाराला भीती वाटते, आपले आपल्या मार्गदर्शकाचे पितळ उघडे पडेल याची! साहजिकच करोना काळात संशोधन प्रक्रिया थंड पडली असणार.तरीही करोना काळात किंवा पुढे,पदवीदान समारंभात शेकडो विद्यार्थ्यांना पी एच डी पदवी मात्र मिळणार,सालाबादप्रमाणे यंदाही या न्यायाने! तुम्हाला एखादे राष्ट्र दुबळे करायचे असेल तर तिथले सैन्य,तिथली अर्थ व्यवस्था दुबळी करण्याची गरज नाही. तिथली शिक्षण व्यवस्था खिळखिळी केली तरी पुरे! अशा अर्थाचे प्रसिद्ध वचन आहे. आतातरी आपण या खिळखिळ्या शिक्षण व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे.फक्त सरकारी यंत्रणेवर,निर्णयावर अवलंबून चालणार नाही.अनेक शिक्षण संस्था,विद्यापीठ स्वायत्त आहेत.के उपयोग या स्वायत्ततेचा? समस्येचे उत्तर दुसऱ्या कुणाच्या हातात नसते.ते आपल्याच हातात आत घरात असते. पण दुर्दैव असे की ज्या पुढच्या तरुण (भविष्याचे, देशाचे आधारस्तंभ वगैरे) पिढीसाठी हे गुणवत्तेचे व्रत करायचे, त्यांनाच ते नको आहे! त्यानाही सगळे सहज साध्य पद्धतीने, कष्ट न करता, कसे तरी या मंत्रानेच हवे आहे. कसेतरी पास करा, कशीतरी पदवी, नोकरी द्या, प्रमोशन द्या, अशी लाचार वृत्ती बळावत चालली आहे. ज्यांना परिश्रमाची, गुणवत्तेची चाड आहे, त्यांना कुणी विचारत नाही. ते अल्पसंख्याक आहेत.त्यांचा आवाज दाबला जातो. त्यांचे कुणी ऐकत नाही.कारण आपल्या देशात सशक्त लोकशाही आहे. काहीही, कसेही करण्याचे स्वातंत्र्य आहे! कुणी ,केव्हा बदलायचे हे सगळे??

संपर्क - ७६५९०८४५५५

## सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ४०० रूपये    द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये    त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

समाजभान

# आभास आणि वास्तव

“ हे नातं परत मिळवण्यासाठी प्रथम शिक्षकांवरील इतर कामाचे ओझे कमी केले पाहिजे.त्यांना फक्त मुलांना ज्ञान देणे व त्यासाठी लागणारे प्रशिक्षण, नवनवीन पद्धती याचे ज्ञान दिले पाहिजे. नियम असावेत पण? नियमाने कागद भरता येतो, शिक्षण नाही. विचार करूया आपली पुढची पिढी ज्ञानी आणि विनम्र तयार होईल याची ! ”



**डॉ.शिरीष र.चौडणकर**

कुर्ला,मुंबई

उच्च शिक्षणात मुलांचा सहभाग वाढावा म्हणून UGC खूप, प्रयत्नशील आहे. उद्देश मुलांचा शिक्षणातील रस वाढावा, मुलांना प्रत्यक्ष अनुभव मिळावा व पदवीनंतर त्यांना एखादी नोकरी मिळावी. त्यासाठी भारतात बरेच आयोग-कमिशन आले. NPE २०२० ने मुलांसाठी खूप विकल्प ठेवले आहेत. यामध्ये मुलांच्या आवडीवर शिक्षण, प्रात्यक्षिकांवर भर दिला आहे. ‘वर्गात शिकवणे एवढीच संकल्पना नुसती नसून समाजात, निसर्गात चला’ ही भावना रूजवण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी परीक्षेची गुणदान पद्धत पण बदललेली आहे. पूर्वी शंभर मार्कांचा पेपर असायचा, मुलांना खूप मोठ-मोठी उत्तरे लिहायला लागायची. आता हे गुण अंतर्गत व बाहय मुल्यमापनात विभागले गेले. काही अभ्यासक्रमात हे गुण पन्नास-पन्नास तर काही मध्ये चाळीस-साठ मध्ये विभागले आहेत. वरवर बघता या सुत्राने आपल्याला कागदावर गुणवत्ता खुप छान दिसते. मुले पण चांगल्या मार्कांनी पास होत आहेत. जुन्या काळात पदवीला साठ टक्के मिळवले म्हणजे तो मुलगा/मुलगी खुपच हुशार समजला जायचा. आता मात्र पदवीत/पदव्युत्तर परीक्षेत साठ टक्के कोणाताही सहज मिळत आहेत. कोरोना काळात झालेल्या बहुपर्यायी प्रश्नांमुळे तर काहींना एम.ए. (भाषा) मध्ये नव्वद टक्के पण मार्क मिळाते आहेत. काही वर्षानी पाचवी व आठवीच्या स्कॉलरशीप परीक्षेत अशा मुलांना शिष्यवृत्ती मिळेल की ज्यांना लिहीता व वाचता येत नाही. याचे कारण परीक्षेत फक्त गोळे रंगवायचे असतात? पण प्रश्न असा की खरच ह्या मुलांना दर्जेदार ज्ञान मिळाले आहे का?

शाळा–महाविद्यालयातील काही वास्तवाचे मुद्दे आज मांडत आहे. खूप विचार करण्यासारखे आहे. खरंच आपण प्रगती करत आहोत का? वरील मूल्यमापनांचा यशायोग्य वापर खरच आपण करत आहोत का?

महाराष्ट्रातील अनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालय बंद पडत आहेत. कारण मुलांचे शिक्षक होण्याचे स्वप्न आता बंदच झाले आहे. पण खरं सांगायचे झाले तर विना–अनुदानित शिक्षण महाविद्यालये जोरात चालू आहेत. त्याच्याकडे बी.एड., एम.एड.साठी ॲडमिशन घेतात. या महाविद्यालयात मुलांना पूर्ण लवचिकता दिलेली असते. त्यांचे वर्ग रविवारी अथवा ऑनलाईन असतात. या महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी बाहेर कोणत्यातरी शाळेत शिक्षक म्हणून आधीच कार्यरत असतात. जो त्या महाविद्यालयात सगळ्या कार्यक्रमात भाग घेतो त्याला अंतर्गत गुण चांगले दिले जातात. शक्यतो कोणालाही नापास केले जात नाही. मुलाना पदवी मिळते व महाविद्यालयाला फीचे पैसे. शिक्षकांना शिक्षणाचे तत्वज्ञान, मूल्यमापन समजले का? खरच अशा संस्था शिक्षणाचे व्यापारीकरण करत नाहीत? अशा महाविद्यालयातील मुले/मुली बाहेर पडल्यानंतर आपल्या पेशाला एकनिष्ठ राहातील का? आपली फी समाजातून कशी वसूल करायची असा विचार करतील? हे एक मूळ कारण आहे शिक्षकांची प्रतिमा मलिन होण्याचे. आज मनापासून शिकवणारे, शिक्षणाची तळमळ असणारे शिक्षक खूप कमी आहेत. जर मला स्वत:ला ज्ञान नसेल तर मी माझ्या मुलांना मी काय शिकवणार? त्यासाठी आपले ज्ञान वाढवण्या पेक्षा तुम्ही मोठे आहात. इंटरनेट वरून माहिती शोधून लिहा' अशा सुचना दिल्या जातात.

संशोधनातील गंम्मत तर फार वेगळी आहे. जे गाईड विद्यापीठाने नेमून दिले आहेत. ते बरेचशे प्राचार्य, विभाग प्रमुख अशा पदांवर आहेत, या लोकांना आपल्या मुलांना मार्गदर्शन करायला वेळच नसतो. अशा मुलांच्या अर्धा वेळ मार्गदर्शकांना शोधण्यातच जातो. मार्गदर्शक भेटल्यावर ज्या ज्ञानाची मुलांना आवश्यकता असते, ते ज्ञान त्यांच्याकडून कधीच मिळत नाही. उलट आता तुम्ही संशोधक आहात, पुस्तके वाचा, इंटरनेट वर माहिती शोधा असे सल्ले दिले जातात. ८०% मुले या कामात अडकतात व बरीचंशी मुले वाम मार्गाचा वापर करतात. एकतर Guest Writer शोधतात किंवा कोणत्यातरी Statistician कडे बसून जास्त पैसे देऊन काम करवून घेतात. खूप वाईट वाटते की हे संशोधन आपल्या पेशाला एकरूप राहतील का?

महाराष्ट्रात काही विद्यापीठात तर Plagiarism वाड.मय चौर्य तपासले जात नाही, तर काही विद्यापीठात प्रत्येक पाठानुरूप तपासले जाते. तर काही विद्यापीठात पूर्ण संशोधनच तपासले जाते. मराठी, हिंदी भाषेसाठी Plagiarism Software नाही, मात्र आहे. मात्र इंग्रजीसाठी आहे. म्हणून महाराष्ट्रात बरेच संशोधन मराठीत चालू आहे. पदवीसाठी शिक्षण असा अर्थ रूपातून निघतो. मग तुम्हीच सांगा, दर्जेदार संशोधन आपल्याकडे कसे होणार?

अभियांत्रिकी महाविद्यालये पण यात कमी नाहीत. ८०% अभ्यास मुले स्वत:च करतात. एकतर महाविद्यालये उशीरा सुरू होतात. ज्या काळात मुलांचे बेसिक पक्के करायचे त्या काळात मुलांना कागदंपत्राची पुर्तता करण्यासाठी पळवले जाते. प्रोजेक्ट बाहेरून विकत घेतला जातो. बऱ्याच महाविद्यालमध्ये शिक्षक हे नोकरी मिळाली नाही म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारतात. त्यांना शिकवण्याचा गंध नसतो, त्यांचा पाया पक्का नसतो. महाविद्यालयाला कमी पगारात शिक्षक मिळतो व त्याच्या कडून ते सारी कामे करून घेतात. बरीचशी

मुले आपल्या assignments आणि Project गुगलवरून जसाच्या तसा छापून लिहीतात. विचार करा, हे शिक्षण मुलांना कसं कळेल ?

बऱ्याचशा शाळेत मूल्यामापनांचा नावाखाली फक्त प्रोजेक्टच दिले जातात. मुलांनी, आईवडीलांनी हे काम करायच आणि स्वत:च सगळ शिकायचं. मुल फक्त कॉपी करतात. बऱ्याच शाळा श्रेणी फक्त वह्या पूर्ण करण्यासाठीच दिलेले असतात. वर्षभर, अहवाल व फोटो यात शिक्षक-मुख्याध्यापक गुंतलेले असतात. काही वर्षानी शाळा वर्षातले सगळेच दिवस काही सण म्हणून साजरे करणार असं चित्र आहे.

थोडक्यात आज आपण आपल्या शिक्षणाचे बाजारीकरण करत आहोत. सगळे अहवाल, फोटो, Online Weeding नविन तंत्रज्ञान वापरून ज्ञान देण्याचा प्रयत्न करत आहोत पण त्यासाठी प्रथम आपण खरच मुलापर्यंत पोहोचत नाही. आपली उर्जा शिकवण्याऐवजी कागद भरण्यात जाते. आजकाल नियम खूप आहेत, शिक्षा पण आहेत पण प्रत्येक जण दिवस ढकलण्यात काम करतोय. शिक्षणातला राम निघून गेलाय,आनंद हरवलाय, गुरू-शिष्याचे नाव विरलंय आणि आता ते परत येण खूप कठीण आहे.

हे नातं परत मिळवण्यासाठी प्रथम शिक्षकांवरील इतर कांमाचे ओझे कमी केले पाहिजे त्यांना फक्त मुलांना ज्ञान देणे व त्यासाठी लागणारे प्रशिक्षण, नवनवीन पद्धती याचे ज्ञान दिले पाहिजे. नियम असावेत पण नियमाने कागद भरता येतो, शिक्षण नाही. विचार करूया आपली पुढीची पिढी ज्ञानी आणि विनम्र पिढी तयार होईल याची !

**संपर्क-९६१९९४०९९०**

# बाप्पा माझे ऐका

**माझी कविता**

गणपत्ती बाप्पा तुम्ही
माझी सायकल घ्या
तिच्यावर बसून माझ्या
शाळेमध्ये जा
मंदिरात राहता तुम्ही
शांतपणे बसून
शाळेतला अभ्यास माझा
बघा जरा करून
रोजच्या लिखाणाला तुमचे
चारी हात वापरा
बघा कसा उडतो मग
भितीने अंगात कापरा
अगोदर जाणून घ्या
परीक्षेचे नेचर
मग बघा सुटतो का
तीन तासात पेपर
आईच्या हातची चव
रोज घ्या चाखून
घरी आल्यावर नका
देऊ दप्तर फेकून
शाळेचा कंटाळा येता
सांगा मला येऊन
मंदिरात बसतो तोवर
तुमचे वाहन घेऊन

**बा. स. जठार,**
(गारगोटी जि.कोल्हापूर)
९८५०३९३९९६

# विद्यार्थ्यांचं कुतूहल जपणारा गुरूजी

“

टॉलस्टॉय यांच्या शाळेत सर्व प्रकारचं स्वातंत्र्य होतं. या शाळेत शारीरिक श्रमाला प्रतिष्ठा होती. शाळेला रेखीव वेळापत्रक नव्हतं.मुलांनी शिक्षकांकडे लक्ष दिलं पाहिजे अशी सक्ती नव्हती.शिक्षक जर उत्तम रीतीने शिकवत असतील तर मुलं आपोआप गप्प बसतात.गडबड करणाऱ्याला परस्पर गप्प बसवतात. हे त्यांना माहीत होतं.शिक्षक एखादा विषय शिकवत असताना मुलांना चित्र काढायची लहर आली तर तसं करण्याची पूर्ण मुभा होती.शिक्षा आणि बक्षीस या दोन्हीपासून शाळा अलिप्त होती.

”



युवराज माने
परभणी

विद्यार्थी घडवतांना शिक्षकांना उत्तमपणे मार्गस्थ करणारा एक शिक्षक म्हणजे टॉलस्टॉय! जो मला माझ्या लेकरांत सतत नवं नवं शोधायला व नवं नवं शिकायला मदत करतो......त्या गुरुजीविषयी ........

महर्षी टॉलस्टॉय हे जगप्रसिद्ध लेखक, कादंबरीकार, विचारवंत होतेच पण तेवढेच प्रसिद्ध शिक्षणप्रेमी देखील होते.बालसृष्टीबद्दल विलक्षण प्रेम, आस्था, जिव्हाळा बाळगणारे एक उत्तम शिक्षक म्हणजे टॉलस्टॉय. मुलांच्या चिमुकल्या विश्वात मूल होऊन डोकावण्यात त्यांना अपार आनंद मिळत असे.लहान मुलं हे त्यांच्या कुतूहलाचा विषय होता. मुलांचं चिमुकलं मन, मुलांचे मनोव्यापार, मुलांचे विचार, मुलांची एकूण भावविश्व त्यांच्या जिज्ञासेचा, अध्यनाचा भाग होता. लहान मुलावर त्यांनी विविध प्रयोग केले.लहान मूल हे त्यांच्या विचारांचे प्रमुख केंद्र होतं.मुलांच्या शिक्षणाविषयी अनुभवावरूनच मुलासंबंधिचं त्यांचं स्वतःचं शिक्षण झालेलं होतं. मुलांना शिकवता शिकवता तेही शिकत असत. अगदी मुलात मूल होऊन!

ङ्गशाळा’ म्हणजे लहान मुलांवर हितकारक प्रयोग करून पहाण्याची ‘प्रयोशाळाच’असं ते मानत. टॉलस्टॉय यांनी खेड्यात मुलांसाठी एक शाळा काढली होती. शाळेच्या प्रवेशद्वारावरच ‘मुक्तद्वार ’ अशी पाटी लटकवलेली होती.या शाळेत कोणीही यावं, केव्हांही जावं....असा मुक्त मोकळेपणा होता.शाळेची वेळ होती ,पण तिचं बंधन मुलांवर नव्हतं.उशीर झाल्याबद्दल शिक्षा नव्हती,कंटाळा आला तर वर्गात बसून राहण्याची सक्ती नव्हती.घंटा होती,पण तिचा धाक नव्हता.म्हणून या शाळेत मुलं आवडीने यायची रमून जायची. उशीर कसला,शाळेच्या वेळेआधीच

मुलं शाळेत यायची. अंगणात उद्यानात मनसोक्त खेळत राहायची. शाळा सुटली तरी घरी जायचं नाव घ्यायची नाहीत. शाळेविषयी इतका लळा मुलांना टॉलस्टॉय यांनी लावला होता.

टॉलस्टॉय यांची ही जगावेगळी शाळा! आपल्या शाळेविषयी टॉलस्टॉय यांनी आपल्या मित्राला एका पत्रात लिहिलं होतं,सध्या मी एका सुंदर काव्यमय विश्वात रमून गेलो आहे.इतका रमून गेलो आहे की त्यापासून आता मला स्वतःला ओढून काढणं जवळजवळ अशक्य आहे.ते विश्व म्हणजे माझी शाळा!.. मुक्तद्वार!... संध्याकाळी मुलांना घेऊन मी लांब लांब फिरायला जात असतो.कोणीही कंटाळत नाही.मजेत गप्पा मारीत येतात. आता आमच्या शाळेच्या इमारतीचे बांधकामही पूर्ण होत आले आहे. मुलांसाठी खास वस्तुसंग्रहालय तयार केला आहे. आठवड्यातून एकदा वनस्पतीशास्त्राचा पाठ घेतला जातो. त्यासाठी आम्ही सर्वजण रानात भटकायला जातो. गवत,फुलं कुत्र्यांच्या छत्र्या इत्यादी निरनिराळ्या झाडाझुडपांचे तपशीलवार निरीक्षण करतो. आठवड्यातून चार वेळा गायन शिकायची सोय आहे. सहा वेळा चित्रकला शिकवली जाते.शाळेचे वर्ग सकाळी आठ ते बारा व दुपारी तीन ते सहा वेळात असतात.पण दुपारचे अधिवेशन दोनलाच सुरू होतं. आणि बराच वेळ चालत राहतं.मुलांना घरी जायला लावणं फार अवघड असतं.त्यांना सारखं नवं,आणखी नवं बरच काही हवं असतं.ती जाता जात नाहीत. संध्याकाळी अर्ध्याहून अधिक मुले उद्यानातं रेंगाळत असतात. जवळच्या एखाद्या झोपडीत निजतात. रात्रीच्या जेवणाच्या वेळी आम्हा शिक्षकांची निरनिराळ्या विषयावर चर्चा चालते. प्रत्येक शनिवारी आम्ही आपली निरीक्षणे एकमेकांना वाचून दाखवतो व पुढील आठवड्यात करायच्या कामाची रूपरेषा तयार करतो...

टॉलस्टॉयच्या शाळेचा मुख्य हेतू सामाजिक उत्कर्ष किंवा दलितांची उन्नती हा नव्हता,तर दलितांची वैयक्तिक उन्नती हाच होता.समाज व व्यक्ती ह्या दोघात टॉलस्टॉयच्या दृष्टीने व्यक्तीला अपरंपार महत्त्व होतं.व्यक्ती जर सुसंस्कृत,ज्ञानसंपन्न व कार्यप्रवण झाली तर मानवतेचं वाटेल तितकं हित करू शकेल, म्हणून व्यक्तिनिष्ठ शिक्षणावर व शिक्षण पद्धतीवर त्यांचा भर होता.टॉलस्टॉय यांच्या या प्रयोगशाळेत स्वातंत्र्य व समता यांचं वातावरण होतं.व्यक्तीचा परिपोष करणाऱ्या स्वातंत्राधिष्ठित शिक्षण पद्धतीलाच त्यांनी अवलंब केलेला होता.प्रत्येक शिक्षकाने स्वतःची दैनंदिनी ठेवावी व तीत मुलांची उल्लेखनीय वैशिष्ट्य ,वर्गात घडलेल्या अर्थपूर्ण घटना इत्यादींचे टिपण ठेवाव असा त्यांचा आग्रह असे.दैनंदिनी लिहिण्याच्या सवयीमुळे शिक्षण आणि शिक्षक या दोघांतही सुधारणा होईल असा त्यांचा विश्वास होता.शिक्षक अंतर्मुख होतील,जागृत राहतील अशी त्यांना खात्री होती.त्यांच्या सहकाऱ्यांनाही ते मान्य होतं. विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानसाधनेची आवड उत्पन्न करणं हेच शिक्षकांचं काम असतं.हेच शिक्षकाचं ध्येय होय. जिज्ञासेचा दिवा पेटविला की,तिथं शिक्षकाचं काम जवळ जवळ संपत.मग प्रत्येकानं आपापल्या गतीनं प्रगती करावी.शिक्षक फक्त साह्य करणार.शिकणं ही एक अत्यंत आनंदाची गोष्ट आहे, हे मुलांना पटलं पाहिजे,पटविले पाहिजे.!

टॉलस्टॉय यांच्या शाळेत सर्व प्रकारचं स्वातंत्र्य होतं. या शाळेत शारीरिक श्रमाला प्रतिष्ठा होती. शाळेला रेखीव वेळापत्रक नव्हतं.मुलांनी शिक्षकांकडे लक्ष दिलं पाहिजे अशी सक्ती नव्हती.शिक्षक जर उत्तम रीतीने शिकवत असतील तर मुलं आपोआप गप्प बसतात.गडबड करणाऱ्याला परस्पर गप्प बसवतात. हे त्यांना माहीत होतं.शिक्षक एखादा विषय शिकवत असताना मुलांना चित्र काढायची लहर आली तर तसं करण्याची पूर्ण मुभा होती.शिक्षा आणि बक्षीस या दोन्हीपासून शाळा अलिप्त होती. मुलांनी स्वच्छ राहावं व खरे बोलावं एवढीच अपेक्षा. मुलांचे शिक्षकांशी संबंध अगदी मित्रत्वाचे असत. शाळेत औपचारिकपणा असा

कुठलाही नव्हता.अभ्यासाचे काम संपलं की, टॉलस्टॉय मुलात मूल होऊन जात. चला रे झाली सुट्टी! असं म्हणून स्वतःच ते पटापट चार-पाच पायऱ्या ओलांडून जीने उतरत. मुलं त्यांच्यामागे हसत खिदळत त्यांना पकडायला मुलं येत मग अगदी मनमोकळी दंगामस्ती ते करत.खेळाचा खराखुरा निरागस आनंद ते भरभरून पिऊन घेत आणि सर्वत्र विखरून टाकीत.टॉलस्टॉय यांना स्वतःच्या विद्यार्थीदशेत असा आनंद कधीही लुटता आला नव्हता.बालपणी टॉलस्टॉय असल्या आनंदाला पारखे झाले होते आणि त्याचं दुःख त्यांच्या मनी सलत होतं म्हणून ते शाळेतल्या मुलांच्या समवेत आपलं बालपण जणू पुनश्च आनंदात जगत होते.

संध्याकाळी ते मुलांना घेऊन लांब लांब फिरायला जायचे.वाटेत खूप गोष्टी सांगायचे. निरीक्षणही चालायचं.निरनिराळ्या विषयांची माहिती ते द्यायचे मुलांना खूप शिकायला मिळायचं.मुलं त्यांचा हात धरून चालायची.मनात येईल ते,वाटेल तसे प्रश्न विचारायचे.जणू त्यांच्या हजरजबाबीपणाची परीक्षाचं!...पण ते कधीच कंटाळा करत नसत. मुलांना समजतील अशा भाषेत ते त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तर द्यायचे.काही मुलं टॉलस्टॉयवर इतकी लोभावलेली होती की,रात्रीसुद्धा त्यांच्याजवळ ती बसत.मोकळ्या गच्चीत बसून गोष्टी ऐकण्याचा सांगण्याचा कार्यक्रम चालू असायचा.केवढा निरागस आनंद होता या शिक्षण पद्धतीत! पुष्कळशा गोष्टी मला मुलंच शिकवतात. म्हणजे मुलेच माझे गुरु आहेत असं म्हणून घेण्यात त्यांना अत्यंत आनंद व अभिमान वाटत असे.

मुलांच्या विकासाची प्रक्रिया म्हणजे एक अलौकिक काव्य आहे,अशी त्यांची भावना होती. मिटलेल्या कलिकेची एकेक पाकळी कशी उलगडत जाते, संवेदनशील मनाचा संपूर्ण फुल कसं विकसित होतं हे पाहण्याचं सद्भाग्य शिक्षक आणि पालक यांच्या शिवाय कोणाच्या अनुभवास येणार! श्रमजीवी माणसांचं जीवन खऱ्या अर्थानं निकोप व कृतार्थ असतं. धार्मिकदृष्ट्या पुनीत असतं;अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणून एखाद्या संध्याकाळी ते मुलांना घेऊन मुद्दा' एखाद्या चर्मकाराच्या झोपडीत जात. तिथल्या ओल्या कातड्यांचा उग्र दर्प नाकात झिनझिनला की त्यांना आनंद होई. हे कष्टकऱ्यांचे निकोप जीवन ते मुलांना दाखवत.महात्मा गांधीवरही टॉलस्टॉय यांचा खूप प्रभाव होता.अशा आदर्श शिक्षकाचं आत्मचरित्र आमच्यासारख्या नवं काहीतरी करू पाहणाऱ्या शिक्षकास सततच प्रेरणादायी ठरतं. आणि आपल्यासमोरील मुलांवर मनापासून प्रेम करायला शिक्वतं.लहान मुलं कशी आनंदाची झरे आहेत हे दर्शवतं...

**संपर्क : ७५१७४७८५७०**





# शिक्षक मित्रांच्या मदतीने...

“

शिक्षकमित्रांच्या मदतीने वारोळा,तालखेड जोडतांडा,धर्मेवाडी व टाकरवण तांडा अशा नऊ ठिकाणी प्रत्येकी दहा ते पंधरा विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गावातच वर्ग सुरू केले गेले .हे शिक्षकमित्र म्हणजे गावातील शिकलेले तरुण , तरुणी आहेत . पालकांनी जागा उपलब्ध करून दिली . कोरोना नियमांचे पालन करून शिक्षकमित्र विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतात .

”



**कचरे प्रभाकर विठ्ठल**

माजलगांव ता.बीड



मार्च -२०२० ला शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० च्या शेवटी कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे शाळा बंद करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाला घ्यावा लागला.१५ जून २०२० ला २०२०- २०२१ या शैक्षणिक वर्षाला शासनाने सुरुवात केली. प्रत्यक्षात शाळा सुरु झाल्या परंतु विद्यार्थीविना शाळांची सुरुवात

करावी लागली. महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिकवण्याचा निर्णय घेतला. परंतु मोठा प्रश्न आमच्या पुढे उभा राहीला आमची शाळा ही आश्रमशाळा असल्याने शाळेत शिक्षण घेणारी मुले ही विमुक्त जाती, भटक्या जमाती, ऊसतोड कामगार व उपेक्षित वर्गातील पालकांची मुले आहेत. अशा या परिस्थितीत गोरगरीब कुटुंबातील विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण कसे घेणार? या कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन असल्यामुळे आमच्या शाळेतील असंख्य पालकांच्या हाताचे काम गेले. शिक्षणाचा प्रश्न तर दूरच ! त्यामुळे शाळेतील प्रवेशित विद्यार्थी कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे शिक्षणापासून दूर राहणार होती. शासनाच्या नियमावली प्रमाणे आश्रमशाळेत ऑनलाईन शिक्षण सुरु झाले. परंतु मुलांच्या समस्या ऑनलाईन शिक्षण घ्यायचे कसे हा प्रश्न निर्माण झाला . यावर मात करायची असेल तर आता गावातच शाळा सुरू केली पाहिजे.व यासाठी शिक्षक मित्राची मदत घ्यावी लागली.

बीड, जिल्ह्यातील माजलगावच्या वारोळा तांडा येथे समाजकल्याण विभागामार्फत प्राथमिक आश्रमशाळा चालवली जाते. शाळेत शिक्षण घेणारी मुलं मागास गटातील आहेत. आजूबाजूच्या बारा गावातील अडीचशे विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेतात . आणि मोबाईल अभावी त्यांचं शिक्षण थांबलं होतं . इथल्या उपक्रमशील शिक्षकांमुळे शाळेने' आयएसओ' मानांकनही प्राप्त केलेलं आहे. कोरोनामुळे शाळा बंद असतानाही शिक्षकमित्रांच्या मदतीने वारोळा शाळेच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवलं. ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक अँड्रॉईड मोबाईल घेण्याची पालकांची आर्थिक स्थिती नाही. शिवाय दुर्गम भागात तांड्यावर शाळा असल्याने इंटरनेट नेटवर्क नाही. यंदा कोरोनामुळे शैक्षणिक सत्र सुरू होणार नाही असा अंदाज आधीच आला होता. पण , विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद पडू द्यायचं नाही असं आम्ही ठरवलं होतं . यातूनच शिक्षक मित्रांची कल्पना पुढे आली. समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ . सचिन मडावी याच्या मार्गदर्शनाने शिक्षकमित्रांच्या मदतीने वारोळा,तालखेड जोडतांडा, धर्मेवाडी व टाकरवण तांडा अशा नऊ ठिकाणी प्रत्येकी दहा ते पंधरा विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या गावातच वर्ग सुरू केले गेले. हे शिक्षकमित्र म्हणजे गावातील शिकलेले तरुण , तरुणी आहेत . पालकांनी जागा उपलब्ध करून दिली. कोरोना नियमांचे पालन करून शिक्षकमित्र विद्यार्थ्यांचा अभ्यास घेतात. शाळेचे शिक्षक या शिक्षकमित्रांना काय शिकवायचे हे सांगतात , विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवतात . एप्रिल महिन्यापासून हा उपक्रम सुरू असल्याने शाळा बंद असली तरी शिक्षण मात्र सुरू आहे .

**संपर्क-८२७५२६८५०६**



**शाळा बंद शिक्षण सुरू!**

# मोबाईल वरची शाळा...?

> सगळ्यात महत्वाचा प्रश्न निर्माण होतोय तो म्हणजे इंटरनेटचा (Internet) ग्रामीण भागात सुरळीत व मुबलक प्रमाणात आहे का? पालकांकडे Android फोन उपलब्ध आहे का? पालकांची तो खरेदी करण्यासाठी मानसिकता किंवा क्रयशक्ती आहे का? हे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत आणि याचे उत्तर मात्र नकारात्मक स्वरुपातच येत आहे. ना शासन यंत्रणा याचे उत्तर देऊ शकतं ना समाजव्यवस्था !!



**सचिन नारायण अभंगे**

कर्जत,रायगड

काय ऐकून नवल वाटले ना ? हो, अगदी खरंय... मागील वर्षी सन २०२०-२०२१ शैक्षणिक वर्षाची सुरुवातच मोबाईलवरून झालेली होती. अगदी तशीच सुरूवात यावर्षी देखील १५ जून २०२१ पासून नवीन वर्ष २०२१ - २०२२ करिता झाली आहे. सद्य स्थितीतील कोरोना विषाणू कोविड-१९ प्रादुर्भाव लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, तंत्रशिक्षण महाविद्यालये या सर्व शैक्षणिक संस्था देखील आता ऑनलाईन शिक्षणाच्या प्रभावाने सुरू होत आहेत.

मुळातच महाराष्ट्रातील शिक्षणाचा गुणात्मक विस्तार जसा प्रभावी आहे. वाडी, पाडा, तांडा, वस्तीवर शिक्षणाची सोय उपलब्ध झाल्याने संख्यात्मक विस्तार देखील जास्त आहे. अशा परिस्थितीत शासन व्यवस्थेच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न चालू झालेले आहेत. मध्यंतरी मोबाईलद्वारा Google Classroom तयार करणेकामी शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य चालू होते. अनेक तंत्रस्नेहींच्या माध्यमातून या उपक्रमाला प्राधान्य दिले जात आहे. परंतु, आभासी पटलावर दिले जाणारे शिक्षण तितके प्रभावी नाही हे माझे स्पष्ट मत आहे. निदान प्राथमिक स्तरावर विद्यार्थी वर्गाला मोबाईल हाताळण्यास देऊ नये ही एक मानसिकता सध्या सर्वत्र चालू आहे. स्वाध्याय किंबहुना गृहपाठ काही अभ्यास द्यायचा असल्यास पालकांचे सानिध्यात द्यावा, असे देखील तज्ज्ञांचे मत आहे. शिवाय मोबाईलवरून शिक्षण चालू आहे म्हणजे खाजगी

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा भरसाठ फी चा मार्ग मोकळा!

असे असताना सगळ्यात महत्वाचा प्रश्न निर्माण होतोय तो म्हणजे इंटरनेट (Internet) वर्ग, विद्युत पुरवठा सर्व ग्रामीण भागात सुरळीत व मुबलक प्रमाणात आहे का? पालकांकडे Android फोन उपलब्ध आहे का? पालकांची तो खरेदी करण्यासाठी मानसिकता किंवा क्रयशक्ती आहे का? हे सर्व प्रश्न निर्माण झाले आहेत आणि याचे उत्तर मात्र नकारात्मक स्वरुपातच येत आहे. ना शासन यंत्रणा याचे उत्तर देऊ शकतं ना समाजव्यवस्था !!

मोबाईलवरील शिक्षण ही संकल्पना जरी चांगली असली तरी ती प्रत्यक्षात रूजायला पुढील काही वर्षे तरी लागतील. पुढील कालखंडात आपल्याला याचा प्रभावी वापर करावाच लागेल. परंतु त्या आधी Android फोन व Internet(आंतरजाल) या सुविधांचा वापर मुबलक असला पाहिजे. दृकश्राव्य माध्यमाप्रमाणे मोबाईल हे शैक्षणिक व्यासपीठ होण्यासाठी सकारात्मक मानसिकता आधी निर्माण करावी लागेल. पालकांच्या नोकरी, सेवाक्षेत्र, धंदे, व्यवसाय यांच्या वेळा ध्यानात घेऊन अध्यापन यंत्रणा तयार करावी लागेल. नाही तर नाकापेक्षा मोती जड असे नको व्हायला. शहरातील पालक वर्ग सुजान व सधन आहे. महागडे मोबाईल तो घेऊ शकतो. परंतु, माझ्या वाडी-वस्तीवरील पालकाचे काय? दोन वेळच्या अन्नाची भ्रांत असलेल्या गरीब माणसाला कोण आणून देणार Android मोबाईल फोन?

खरे तर मुलांना मुक्त शिक्षण घेऊ द्या. वक्तृत्व, निबंध, वादविवाद, मापन, संख्याज्ञानावर आधारित शब्दकोडी, कूटप्रश्न, गायन, वादन, नृत्य इत्यादी कला, महापुरुषांचे जीवनचरित्र वाचन यातून शिकू द्या ! अनौपचारिक शिक्षण तो सहज निसर्गाच्या सान्निध्यात राहून घेऊ शकतो. कोवळ्या मनांवर उगाचच स्पर्धेचा आणि आर्थिक विषमतेचा अजिबात ताण नको. नाही तरी देशात आरटीई २००९ धोरण प्रभावी कार्यवाही चालूच आहे. फक्त प्रश्न उरतोय तो माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांचा. त्याकरिता शासनाने स्मार्टफोन, टॅब,इ.साधने उपलब्ध करून द्यावी. महाराष्ट्रातील मुलांच्या शिक्षणाची काळजी असेल तर!

**संपर्क : ८६००४५४५४३**

**Play with me...**

little birdy,little birdy
come with me
come with me and play  with me

Fly-fly-fly
little butterfly,butterfly
come with me
come with me and play with me
fly-fly-fly

little dogy,little dogy
come with me
come with me and play with me
bow-wow-bow- wow

little cat,little cat
come with me
come with me and play with me
mew-mew-mew

(same way:little baby,squirrel,
monkey, donkey etc.)

-Rathod Guruji,Raver
8766528150

# शिक्षणाची वारी विद्यार्थ्यांच्या दारी...

“

शिक्षकांनी ऑनलाइन शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी बनवली.यामध्ये पहिली ते चौथी मधील गावातीलच विद्यार्थी होते. काही विद्यार्थी हे मजुर कुटूंबातील होते. गावातील विद्यार्थ्यांसाठी मग मंदिराची जागा निवडली गेली. मंदिरातच विद्यार्थ्यांसाठी शाळा भरली.शिक्षक वेळापत्रक आखून यातील सर्व विद्यार्थ्यांना शिकवू लागले.

”



प्रतिभा सुरेश सोनवणे
शिरपूर जि.धुळे



शिरपूर तालुक्याच्या पश्चिमे कडील 'टेंभे बु ! हे एक छोटेसे गाव. राजपूत, भिल्ल, बौद्ध,कोळी, समाजाचे वास्तव्य, या गांवात आहे. हजार बाराशे लोकसंख्या असणारे टुमदार गाव.गायी-गुरांचे पालन करणे,दुग्ध-व्यवसाय करणे तसेच शेती आणि शेतमजुरी करणे हा येथील पालकांचा

व्यवसाय.या गावात इ.१ली ते ४ थी जिल्हा परिषदेची शाळा असून शाळेचा पट ५५ आहे व २ शिक्षक कार्यरत आहेत.

जेमतेम तुटपुंज्या मजुरीवर गुजरान करणारे येथील पालक ऑनलाईन शिक्षणासाठी आपल्या मुलांना मोबाईल कसा घेऊन देतील? मुलांचे सोडा तर पालकांजवळ देखील स्मार्ट मोबाईल नाहीत.अशा परिस्थितीत आपल्या मुलांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याची इच्छा नसतांनाही पालक काही करू शकत नाही. शासनाने विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय उपलब्ध करून दिला असला तरी स्मार्ट फोन,स्मार्ट टी.व्ही.नसल्यामुळे तसेच रेंज कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेऊ शकत नाहीत.हे लक्षात घेऊन आमची (शिक्षकांची) कल्पकता जागरूक झाली आणि शिक्षणास सुरवात झाली.

माझ्यासोबत सुरेश सोनवणे सर सहकारी म्हणून आहेत. कमालीचे उत्साही व उपक्रमशील. शाळा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान दोघांनाही पाहवत नव्हते. काय करावे सुचत नव्हते.शालेय समितीचे सहकार्य, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांच्या मार्गदर्शनात शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्यातून आम्ही दोनही शिक्षकांनी थेट शिक्षण मुलांच्या दारी घेऊन जाण्याचा उपक्रम हाती घेतला. पालकांना व विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांना सोशल डिस्टन्स ठेऊन गटागटाने अभ्यासाला बसवले.स्वतः विद्यार्थ्यांमध्ये बसून त्यांना मार्गदर्शन केले.जेणेकरून कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आम्ही ऑफलाईन शिक्षण देण्याची शक्कल लढवली.

विद्यार्थ्यांमध्ये आमुलाग्र बदल करण्यासाठी विद्यार्थी व पालकांकडे मोबाईल नाहीत. ही बाब हेरून 'समस्या तिथे मार्ग, गरज तिथे शोध'या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टळले, व शैक्षणिक सातत्य टिकवून नियमित शाळेप्रमाणे विद्यार्थी घरी राहूनच घरातील उपलब्ध शैक्षणिक साहित्याचा वापर करीत आहेत.शाळा बंद, शिक्षण सुरू या उपक्रमामुळे मुलांच्या आनंदासोबतच शैक्षणिक प्रगतीत भर पडत आहे.

यासोबतच शालेय व्यवस्थापन समिती च्या सभा, घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप, शाळा, वर्गखोल्या सफाई, शालेय परिसर स्वच्छ, वृक्षारोपण, शालेय आवार, स्वच्छतागृह सफाई, गाव सर्वेक्षण, लसीकरण, पोषण आहार वाटप, असे अनेक उपक्रम सुरू ठेवून शाळेशी विद्यार्थ्यांची नाळ जोडून ठेवली आहे.

अशा उघडच्यावरच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांचा फार काही अभ्यास होईल अशी शिक्षकाना फार अपेक्षा नाही. केवळ विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात राहावा, त्याच्या कानावर शिक्षकाचे चार शब्द पडावेत हीच भावना आहे. दिवसातील २-३ तास तरी मंदिरात किंवा गावात एकत्र येत शिक्षक शिकवत असल्याने ऑनलाइन शिक्षणापासून वंचित असलेल्या या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुललं आहे. मागील दीड वर्षापासून शाळा बंद असल्याने मागील वर्षीचा अभ्यासक्रमाची मुलाना उजळणी करून देण्याचा प्रयत्न होत आहे.

**संपर्क:९८५०१६५२९१**

शाळा बंद शिक्षण सुरू !

# दुर्गम भागातील मुलाचे शिक्षण व शिकणे

“ सर्व शिक्षकांनी स्वत:ची संपर्क नंबरे देऊन मुलांना अध्ययना विषयी मुक्त चर्चा मोबाईल द्वारे करण्यास सुचित केले. परिणामी या सर्व यंत्रणेचा वापर करून आम्ही दुर्गम भागात शिकणे, शिक्षण यांची नाळ टिकवुन ठेवली. ”



सुरेश गोकुळ कुंवर
धडगाव जि.नंदुरबार

सातपुड्याच्या दुर्गम भागात वसलेला नंदुरबार जिल्हा. त्यातील अतिदुर्गम म्हणुन ओळखला जाणारा धडगांव हा तालुका. त्यात दोन सुंदर, वळणदार घाटातील डोंगराळ भागात वसलेले माझे ‘काकडदा ’ केंद्र व त्यातील घेरपुजा ही वस्ती, दुर्गम भागात स्थानिक परिस्थिती चा विचार करतांना तेथील शिक्षणाची सर्व सुत्रे ही बदलतात.

मागील वर्षापासून कोविड-१९ या आजाराची सुरूवात झाली. सुरूवातीला दुर्गम भागातील आमच्या मुलांना काही कळेना की नेमक काय झाल? कारण कितीतरी वर्षापासून हे मुलं टी.व्ही, मोबाईल, मिडीया पासुन लांब. नंतर कर्मचारी म्हणुन प्रशासनाने ये-जा करण्यास अनुमती दिली. तेव्हा अंतर ठरवुन या चिमुकल्यांची संवाद साधला व त्यांना ‘कोवीड-१९‘ विषयीची जाणीव करून दिली.

शाळा बंद पण शिक्षण कसे चालु ठेवावे? दुर्गम, डोंगराळ भागात पाडे-घरे ही लांब वसलेली मग या माझ्या चिमुकल्यांपर्यंत शिक्षण कसे पोहोचेल? याची घालमेल मनामध्ये सुरू झाली. त्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक जगन्नाथ बागुल व उपक्रमशील शिक्षिका माधुरी बाविस्कर यांच्या सहकार्याने खालील प्रयोग, कृती करण्यास सुरूवात केली. यात मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात कसे आणता येईल? दुर्गम भागातील शिक्षण व शिकणे कसे साध्य होईल? यासाठीच्या कृती आम्ही घेरपुजा येथे करू लागलो. केंद्राचे पालक नरेंद्र अहिरे सर यांचे मार्गदर्शन होतेच.

सर्वप्रथम इयत्ता चौथी व पाचवी नेमके किती मुलांकडे मोबाईल आहेत याची चाचपणी केली.

मोबाईल असणाऱ्या हुशार मोठ्या वर्गातील मुलांकडे संपर्काची जबाबदारी सोपवली.

इ.चौथी व पाचवी च्या मुलांमार्फत आम्ही इतर इ.दुसरी ते तीसरी वर्गाच्या मुलांना त्यांना संपर्क करून अध्ययनाच्या कृती करण्यास, सराव करण्यास सांगितले.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नंदुरबार यांच्या मार्फत पुरवलेल्या स्वाध्याय पुस्तिकांचा मुलांना त्यांच्या दुर्गम भागातील अध्ययन, काठिण्य पातळी नुसार स्वत: सर्व शिक्षकांनी मिळून स्वाध्याय संच बनवले व प्रत्यक्ष देऊन सराव करून घेतला.

प्रतिमाह शालेय पोषण आहार वाटप वेळी मुलांना सुरक्षित अंतराने मैदानावर बसुन गणिती पाढे, शब्द, कविता यांचा सराव करून घेतला.

सर्व शिक्षकांनी स्वत:ची संपर्क नंबरे देऊन मुलांना अध्ययना विषयी मुक्त चर्चा मोबाईल द्वारे करण्यास सुचित केले. परिणामी या सर्व यंत्रणेचा वापर करून आम्ही दुर्गम भागात शिकणे, शिक्षण यांची नाळ टिकवुन ठेवली.

या वरील प्रयोग-कृतींचा सर्वच मुलांवर यथार्थ परिणाम झाला असे नाही. परंतु मुलांना कोविड-१९ ची जाणीव होऊन स्वय-प्रेरणेने त्यांना स्वत: काय साध्य करता येईल याविषयी एक सकारात्मक मार्ग शोधता येण्यास मदत झाली.

दुर्गम, डोंगराळ भागात काही निवडक मुलांचे शिक्षण संपर्का अभावी किंवा शेतीची कामे, गुरे चारणे या विविध कामामुळे दुरावले, पण त्यांनाही प्रत्यक्ष सर्व शिक्षकांनी भेटी, गृहभेटी करून 'शिक्षण'.व 'प्रवाह' यांत समाजित करणेसाठी प्रयत्न चालु ठेवलेत.

दुर्गम भागात शिक्षणातील अडथळे शोधण्यात नंदुरबार डायट टिम, अधिकारी वर्ग क्षेत्रिय अधिकारी याद्वारे होणारी ऑनलाईन संपर्क सत्रे यांचीही मदत झाली.

**संपर्क: ८८८८६३६३२४**





## शाळा बंद शिक्षण सुरू !

# पूनश्च हरिओम

> “आमचे सांगवी बीट. सातपूड्याच्या पायथ्याशी तीन केंद्रे आणि शाळा आदिवासी नि डोंगराळ भाग. निसर्गरम्य वातावरण. सोबत अवघड क्षेत्रसुद्धां. सर्वच शिक्षक उत्साही नि तरूण. मुलांसाठी काहिना काही उपक्रम सुरूच.
>
> कोरोनाचा कठीण काळ मुलांच्या शिक्षणासाठी आडकाठी बनून आलाय. ऑनलाईन-ऑफलाईन, लॉक-अनलॉक या गोंधळात मुलांच्या शिक्षणाची गती मंदावली. मुलांचा अभ्यास थांबायला नको, उजळणी व्हायला हवी. मुलांपर्यंत पोहचायला हवे यासाठी आम्हा बीटातील शिक्षकांची धडपड सुरू झाली. अर्थातच मार्गदर्शन होते डॉ.नीता सोनवणे यांचे.”



**मनोहर चौधरी**

शिरपूर-जि.धुळे

कोरोना परिस्थितीमुळे वर्षभरापासून विद्यार्थ्यांसाठी शाळा बंद आहेत.ऑनलाईन शिक्षण सुरू असले तरी १००% विद्यार्थी यात सामावलेले नाहीत,ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन बीटामध्ये इयत्ता पहिली व दुसरीला शिकवणाऱ्या शिक्षकांचा कार्यशाळा येथे घेण्यात आला.

कोरोना नियमांचे पालन करून वर्गातील सर्व मुलांना एकत्र न आणता गटपद्धतीचा अवलंब करावा,असे ठरविण्यात आले. समजा २० विद्यार्थ्यांचा वर्ग असल्यास २ गट करावे. जेथे विद्यार्थी संख्या जास्त त्या परिसरात जाऊन त्या त्या गटाला शिक्षकांनी मार्गदर्शन करायचे आहे.एका गटासाठी एकच शिक्षक राहतील.एका गटाला वेळ दिल्यानंतर मग दुसऱ्या गटाकडे जायचे आहे.या कार्यशाळेत प्रत्येक वर्गशिक्षकांनी वर्गाचा पट,त्यानुसार गट किती पडतील,गटांचे ठिकाण व वेळ याविषयी सादरीकरण केले.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गट पाडून नेमके काय साध्य करावे याविषयी बोलतांना डॉ. नीता सोनवणे यांचे मार्गदर्शन नि सुचना मोलाच्या ठरल्या. आधी मुलांची भीती मनातून काढा, कौटुंबिक माहिती मुलांना विचारा,त्यांची नावे लक्षात ठेवून त्यांच्या नावाने त्यांना हाक मारा म्हणजे आपुलकी/जवळीक निर्माण करा. परिचित खेळ घ्या, कृतीयुक्त गाणी घ्या,त्यांना छोट्या छोट्या गोष्टी सांगा.काही गोष्टी मुलांकडून शिका.हे करत असतांना,मुलांच्या वैयक्तिक स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्या. आढावा घ्या मगच मुलाला गटात घ्या. आणि मग पाठ्यपुस्तकाकडे जाऊ या. कोणत्या क्रमाने अध्यापन करायचे ते आधी ठरवा. केलेल्या कामाच्या

नोंदी ठेवा,विद्यार्थी उपस्थितीबाबत पक्की हजेरी भरण्यास सुरुवात करा. या सर्व सुचना देत शिक्षणविस्तार अधिकारी नीता सोनवणे यांनी शिक्षकांत आत्मविश्वास निर्माण केला. तसेच मुलांना ऑफ लाईन अध्यापन करतांना येणाऱ्या संभाव्य अडचणी विषय मित्र माजी विद्यार्थी यांची मदत यावर चर्चा करण्यात आली. चर्चेत शिक्षकांनी सहभाग नोंदविला. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सर्व शिक्षकांना कामाकरता शुभेच्छा दिल्या. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने या अगोदरही शिक्षकांसाठी कार्यशाळा झाल्या होत्या. त्या कार्यशाळेतील मुद्यांची सांगड घालण्यात आली.

आज तीन आठवडे या उपक्रमास होत आहेत. फलनिष्पत्ती अशी आली की,सर्व शिक्षक मनापासून कार्य करीत आहेत,परिसरात जाऊन गटपद्धतीने मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचे कार्य सुरू आहे. क्षणभर विद्यार्थ्यांना असा भास होतोय की, माझी शाळा बंद नाही तर शाळा माझ्या अंगणात आली आहे, माझे सर अध्यापनासाठी माझ्या घरापर्यंत येत आहेत आणि आमचे शिक्षण चार भिंतीत नसून मोकळ्या आकाशाखाली सुरू आहे.म्हणजे जे उद्दिष्ट समोर ठेऊन कार्यशाळा घेतली ते उद्दिष्ट सफल होतांना दिसतेय. सांगवी बीट,सर्व शिक्षकांच्या प्रयत्नांमुळे यशस्वी होत आहे,उन्नत होत आहे. आणि पूनश्च हरिओम हा मंत्र जपत सारेच कामाला लागले आहेत.

**संपर्क : ९८८१०३३२७०**

## उपक्रमाबद्दल प्रतिक्रिया :

**के.व्ही भदाणे (केंद्रप्रमुख)**

शासनाच्या निर्देशानुसार कोरोना नियमांचे पालन करून गावात मोकळ्या जागी मुलांना गट पद्धतीने शिकविण्याचा आनंद नि समाधान शिक्षकांना मिळते आहे.

**चंद्रशेखर पाटील (पदोन्नती मुख्याध्यापक)**

पहिल्या वर्गातील मुलांकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे म्हणूनच सर्व नवीन दाखल झालेल्या मुलांकडे काळजीपूर्वक लक्ष देवून लेखनपूर्व व वाचनपूर्व सराव करून घेत आहोत.

**मनोहर पवार (पदोन्नती मुख्याध्यापक)**

पहिली ते आठवीच्या वर्गांना मागील अभ्यासक्रमानुसार शिक्षक घरोघरी जावून गटपद्धतीने उजळणी घेत आहेत. ऑनलाईन-ऑफलाईन पाढे पाठांतर, शब्द वाचन, स्पेलिंग पाठांतर करून घेत आहोत.

**संदीप पाटील (आंबे केंद्र)**

मार्च २०२० पासून शिक्षणात पडलेला खंड पहाता मुलांना प्रत्यक्षात शिक्षणाचे धडे देणे गरजेचे वाटले आणि या कार्यशाळेतून मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी, पायाभूत कौशल्य विकसनासाठी मनोरंजक पद्धतीने मुलांना अभ्यासाकडे वळविण्याचा नवा मार्ग सापडला.

# धन्य ते बेडेकर विद्यामंदिर...!



मीना जयंत अभ्यंकर
पनवेल

"आमच्या पिढीने खूप आनंद उपभोगाला पण भावी छोटे छोटे जीव मात्र ऑनलाईन शिक्षणात पार गढून गेले असले तरी त्यांच्या डोळ्यातील भाव मात्र वेगळेच दिसतात व त्यांची शिकण्याची पद्धत बघून समाज म्हणून जगणाऱ्या मनुष्याचा पार विध्वंस झाला आहे. मनुष्य जगतो तो केवळ समाजामुळे. ग्रुप करून पण आता सारेच बदलले व होत्याचे नव्हते झाले."

आमच्या लहानपणी शाळा ही शिक्षणाची जननी. तिचे स्थान फार मनावर कोरले गेले. तेथील प्रत्येक क्षण आजही आठवतो. तेथील शिस्तप्रियता, तो नियमितपणा, सर्व शिक्षकांचे मायेने शिकवणे, कोणीही हात राखून शिकवत नव्हते. त्यामुळे आम्ही मुले ही समरसून त्या शिक्षणाचा उत्तम लाभ घेऊ शकलो. अगदी छोट्या गोष्टीतून त्यांनी गणित शिकवले मुलांच्या पट्ट्या जमा करून त्या मोजून त्यातील काहींना वाटून त्यातून बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, शिकवले. सर्व विषयांचे इतके सुदंर ज्ञान देत की तो विषय अचानकच आवडायला लागायचा व त्याविषयी प्रेम आपुलकी वाढायची. या अशामुळे शाळेत एकाग्रबुद्धीने सारे विद्यार्थी विद्याग्रहण करीत. त्याखेरीज कुठेही शिकवणी लागत नसे. तसेच शाळेत मिळून मिसळून वागण्याची व आपल्यातील दुसऱ्याला देण्याची भावना रूजवली गेली. कोणीही मोठा नाही की कुणी कमी नाही. यामुळेच आमचे बालपण त्या शाळेच्या गणवेशातही हे खुलून दिसायचं. मैदानी खेळ खेळून शारीरिक व्यायाम व्हायचा आणि साहजिकच डब्यातील पोळीभाजी खाऊन नळावर हाताच्या ओंजळीने पाणी प्यायची सवय होती. तसेच सर्व शिक्षकही प्रेमाने वागत. एखाद्याला कुठे लागले तर त्याची काळजी घेणे त्यात अगदी घरोब्याचे संबंध जागवत. त्यांनी कधीही वर्गाबाहेर उभे केले तर उगाचच शरमल्यासारखे वाटे व स्वभावाच्या कमतरतेने साहजिकच शरीराला मनाला समजावले जायचे व आपल्या मध्ये सुधारणा केली जायची आणि आदर्श पणा अंगी बाणवला जायचा. राष्ट्रगीतापासून शाळेला सुरूवात होई. प्रत्येक तासाला घंटा वाजे. त्याचा आनंद. येणाऱ्या

शिक्षकांबद्दल प्रेम प्रत्येकाच्या एक साथ नमस्ते तून सिद्ध होई. तो काळही चांगला होता. नवीन पिढी ही त्यात खूप रूजली व आदर्श घडत गेली त्यामुळे शाळेत जातात म्हणजे घरच्यांना कसलीही काळजी नसे व त्यांचा सर्वांगीण विकास ठरलेलाच असे. शाळेमुळे अनेक मुले जवळ आली. प्रेमाची भावना रूजली कोणीसाठीही धावून जाण्याची शिकवण ही शाळेनेच दिली.

आता मात्र सर्वच अधांतरी झाले. एका कोरोनामुळे या छोट्यांचे आयुष्यच बदलून गेले आहे. ते ऑनलाइन शिक्षण बघून त्यांची कीव येते. त्यांना घरातील शिक्षणाचा खरोखरचं कंटाळा येतो. बाहेर जाणे नाही, मोकळ्या हवेत फिरणे नाही. सारखे एका नियमाने जखडून ठेवल्याने त्यांची ही वाढ सहाजिकच खुंटणार व स्वैराचारी नवीन पिढी निर्माण होऊच शकणार नाही. कितीही केले तरी कुंडीत असलेले रोपटे प्रकाश, वारा, उजेड याचा शोध घेते व त्याच दिशेला वाढते या झाडाच्या रोपट्याची ही अवस्था तर त्या कोवळ्या मुलांची मानसिकता काय म्हणावी ? त्यांना मुक्तविहार करता येईल तोच त्यांचा खरा आनंद. या त्यांच्या मानसिकतेला आपणही जबाबदार आहोत. आपल्या मनाची भीती व बाहेरील शिक्षणाचा बोजा सतत ऐकून तीही भांबावली गेली आहेत. आमच्या पिढीने खूप आनंद उपभोगाला पण भावी छोटे छोटे जीव मात्र ऑनलाईन शिक्षणात पार गढून गेले असले तरी त्यांच्या डोळ्यातील भाव मात्र वेगळेच दिसतात व त्यांची शिकण्याची पद्धत बघून समाज म्हणून जगणाऱ्या मनुष्याचा पार विध्वंस झाला आहे. मनुष्य जगतो तो केवळ समाजामुळे ग्रुप करून सारेच बदलले व होत्याचे नव्हते झाले. आमची पिढी केवळ लहाग्यांना नव्या गोष्टीत रमवून ठेवू शकते पण म्हणावे तसे स्वातंत्र्य त्यांना देऊ शकत नाही हे नक्कीच खरे.

**संपर्क : ९२२४३३८१८६**

## माझी कविता

### पाऊस आला आला...

पाऊस आला आला
चिंब मन हे भिजवून गेला ।।धृ।।

तृषार्त धरा जी भिजली
हिरवाईचे लेणे सजली
मृदगंध पवनी विखुरला
जणू कस्तुरीचा सुगंध पसरला ।।१।।

शिवारी अमृतघन बरसले
कृषिवल मनोमन संतोषले
काननी मयुर नाचला
इंद्रधनुचा खेळ रंगला ।।२।।

तरूवर वृक्ष अन वेली
दलदलांतून साद हा घाली
विधात्याचा कुंचला फिरला
नवचित्रात निसर्ग अवतरला ।।३।।

**मनोज वनमाळी**
दहिसर,मुंबई
९४२२४९०२४२



शाळा बंद शिक्षण सुरू !

# माझे जीवन कौशल्य !

“

*अबुराज नावाच्या एक मुलास झाडांना पाणी टाकण्यास सांगितले. पालकांनी त्याच्याकडून ते करूनही घेतले. दुसऱ्या दिवशी तो मुलगा स्वतः झाडांना पाणी घालू लागला. त्यामुळे त्याची व झाडांची ओढ निर्माण झाली, त्याच नात निर्माण झाल. त्यामुळे त्याचे जीवन कौशल्य विकसीत होवू लागलं. म्हणून सांगतो. ‘‘ जसे पेरू तसे उगवेल...’’*

”



**मनोहर महादू चौरे**
पिंपळद ता.जि.नाशिक

नाशिक जिल्ह्यातील नावाजलेली शाळा, जि.प.शाळा-पिंपळद (ता.) या शाळेत नवनवीन उपक्रम राबविले जातात. जिल्ह्यातील प्रथम ISO शाळा. कोरोना-१९ कालावधीत मुंलाना ‘माझे जीवन कौशल्य’ या उपक्रमावर भर दिला.

सध्या संपूर्ण देशात लॉकडाऊन काळात असल्या कारणामुळे विद्यार्थी व पालक घरीच असायचे. या कालावधीत पालकांनी, मुलांना गुणात्मक वेळ देऊन मुलांचे भावनिक विश्व जपायचे आहे, हसत खेळत वेगवेगळ्या उपक्रमांतून रोजच्या कामातून जीवन जगण्यासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

दररोज मुलांकडून वेगवेगळे उपक्रम राबवून घेण्याची जबाबदारी पालकांवर सोपवली. उदा. स्वतःचे कपडे उचलून घडी घालून व्यवस्थित नीट- नेटके ठेवणे,. परसबागेतील झाडांना पाणी घालणे, कोबंड्यांना झाकणे, भाऊ/बहिणीचे दफ्तर ठेवणे, जुनी पुस्तके वह्या वेगवेगळे करून ठेवणे, स्वतःची तयारी स्वतःकरणे, शेतीची कामे करणे, शर्टला बटन लावणे, देवपुजा करणे, प्रार्थना करणे, Whats app वरती मुलांना अभ्यास देणे व तो करून घेणे .

ह्या वर्षी इयत्ता पाचवीचा वर्ग असल्यामुळे मुलांना छोटे-छोटे उपक्रम देवून प्रोत्साहित करतोय आहे. मुलांच्या आवडीचे विषय/कृती असल्यामुळे सर्व करू लागली. मुले खेड्यातील असल्याने त्यांना सर्व गोष्टी ज्ञात आहेत कोंबड्या झाकणे, बकऱ्याना पाणी घालणे, गाईला चारा टाकणे, देवपुजा करणे, झाडांना पाणी घालणे, हे अभ्यासा व्यतिरिक्त असल्यामुळे मुले आनंदाने करू लागली. आणि त्यातूनच ‘मुलांचे जीवन

कौशल्य' विकसित होऊ लागले. आणि त्यामुळे मुलांना त्यांची गोडी निर्माण झाली. अशाच एका मुलाची छोटीशी कहाणी....

अबुराज नावाच्या एक मुलास झाडांना पाणी टाकण्यास सांगितले. पालकांनी त्याच्याकडून ते करूनही घेतले. दुसऱ्या दिवशी तो मुलगा स्वत: झाडांना पाणी घालू लागला. त्यामुळे त्याची व झाडांची ओढ निर्माण झाली, त्याच नात निर्माण झाल. त्यामुळे त्याचे जीवन कौशल्य विकसीत होवू लागलं. म्हणून सांगतो. '' जसे आपण पेरू तसे उगवले...''

कोरोना काळात शाळा नसल्यातरी मात्र विद्यार्थी अभ्यास करत आहेत. काही मुले ही Whatsapp च्याद्वारे, काही मुलांना स्वाध्याय पुस्तिका दिलेल्या आहेत. तर काही मुले ही प्रत्यक्ष फोन करून, पालकांच्या मदतीने, किंवा लहान मोठ्या भावडांच्या मदतीने अभ्यास करत आहेत.

प्रत्यक्ष गावात जाऊन सुध्दा काही मुलांना आम्ही अभ्यास देत असतो. व तपासून घेत असतो. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक/पालक यांचे अतुट नाते निर्माण झाले आहे.

**संपर्क– ८४४६४६१२७६,**

## माझी कविता

१) मिल्क इस व्हॉईट, कॉफी इस ब्लॅक,
धीरे धीरे चल, वरना गिर जाएगा स्लॅप.

२) माय मदर इर टीचर, ॲण्ड फादर अलसो टीचर,
जल्दी-जल्दी काम कर वरना बढ जाएगा टेंपरेचर

३) आइस इस कूल ॲण्ड टी एस हॉट,
बसु नको त्याच्यावर तुटलाय तो कॉट.

४) यल्लो इस म्यॉंगो ॲण्ड रेड इस ॲप्पल,
जल्दी से भाग यहासे नही तो खाएगी चप्पल.

५) मीठाई इस स्वीट, बजेटमे भी फिट,
आमटी चांगली बनवा रे, कमी आहे मीठ.

६) जब पब्जी हुई बॅन तो, रस्ते पे उतरी गँग,
१० वी का मॅथ्स पढके दिमाग हुआ हँग.

७)घरात आहे कम्प्युटर, त्यानं वाढतलंय लाईटचं मिटर
मला चालवायला शिकायचंय नांगरणीचा टॅक्टर

८) टी ॲण्ड खारी इस बेस्ट कॉंबीनेशन,
सायन्स के पेपर के पपर के पहले होता हे लूज मोशन

९) माय फेवरेट बर्ड इस सीगल, स्ट्रॉंगेस्ट बर्ड इस ईगल,
थंड लग जाएगी, जल्दी ओढलो कंबल.

१०) आय डोंट लाइक डोंकी, बट लाइक मंकी
बायोलॉजी वाचताना नेहमी लागते डुलकी,

११) इंद्रधनुष्यात रंग असतात सात, लॉकडाऊनमध्ये
पगारात झाली कपात,
दिवसभर सॅनिटायझर लाऊन उलले संगळ्यांचे हात.

१२) पोयम इस लाइट, शॉर्ट बट स्वीट,
शाळेचे कपडेही होतायत लॉकडाऊनमध्ये फिट.

**-जानकी संजय गोरे**
कर्जत जि.रायगड
७२७६४१३६५१

“

समान वैशिष्ट्यांच्या आधारे सजीवांचे वर्गीकरण केले जाते. पण काही सजीव असे असतात की,त्यांचे समजातीपेक्षा एखादे वैशिष्ट्ये वेगळे असते किंवा दुसऱ्या जाती / प्रजाती/ वर्गाची वैशिष्ट्ये त्यांच्यात आढळून येतात. अशी विचित्र संगम असलेली वैशिष्ट्ये त्या सजीवांना वेगळेपण प्राप्त करून देतात, ते अधोरेखित करणारे हे सदर ‘आम्ही आहोतच वेगळे!’

”

# ताठरणारी बकरी



**डॉ.नंदा हरम**

पुणे

**महेश:** आई... आई...लवकर ये गंमत बघायला.

**आई:** एवढं काय आहे, महेशं!

**महेश:** हा व्हिडीओ बघ.

**आई:**अरेच्चा, काय होतंय या बकरीला? ती अशी बघता-बघता कशी पडते? आणि अशी ताठ होते?

**महेश:** अगं, तेच सांगायचं आहे, तुला!

**आई:** बाळा, तुला जेवायला बोलवायलांच येणार होते. एवढ्यात...

**महेश:** थांब ग आई! आपण नंतर जेवू.

**आई:** बरं... हरकत नाही. थांब, मी जरा गॅस बंद करून येते. सगळं झाकलेलं आहे ना, बघून येते.

**महेश:** आई, ही बकरी दुर्बल बकरी, घसरणारी बकरी, ताठरणारी बकरी, चिंताग्रस्त बकरी किंवा टेनेसी बकरी म्हणून ओळखली जाते.

**आई:** टेनेसी...म्हणजे अमेरिकेत सापडते की काय?

**महेश:** माझी हुश्शार आई! बरोबर ओळखलंस. ही बकरी अमेरिकेच्या टेनेसी या राज्यात सापडते.

**आई:** ती अशी पडते का?

**महेश:** अग, तो आनुवांशिक विचार आहे, मायोटोनिया कॉन्जेनीट ती गोंधळली, घाबरली किंवा आश्चर्यचकित झाली कि खाली पडते आणि तिचं सगळं अंग ताठरतं.

**आई:** पहिल्यांदाच ऐकतेय मी...! पण नेमकं काय होतं त्या बकरीला?

**महेश:** सांगतो सारं! या बकरीला 'मायोटेनिक बकरी' सुध्दा म्हणतात. स्नायुंच्या उद्दीपनात क्लोराइड आगन्सची भूमिका सुस्पष्ट करण्यासाठी तसेच त्या संशोधनात मायोटेनिक

बकरीचं फार महत्त्व आहे.

**आई:** असं संदिग्ध बोलू नकोस, महेश.

**महेश:** अग, वैज्ञानिक जगतात १९०४ साली सर्वप्रथम या बकरीच्या ताठरपणाविषयी वर्णन केलं. गेलं. १९३९ मध्ये याचं वर्णन 'कॉनजेनिटल मायेटोनिया' (Congenital myotonia) म्हणून केलं गेलं.

**आई:** नेमकं हे कशामुळे होतं, ते केव्हां समजलं?

**महेश:** १९९६ मध्ये, जेव्हां बकरीच्या जनुकात झालेल्या परिवर्तनामुळे स्नायू ताठर होतात, हे सर्वप्रथम समजले. आणि हे सुध्दा शक्य झालं, जेव्हां या जनुकाचा समतुल्य जनक उंदीर आणि माणसात दिसून आला.

**आई:** बाप रे! कमालच आहे!

**महेश:** १९३९ मध्ये ब्राऊन आणि हार्वे या शास्त्रांज्ञानी या बकरीवर बरेच प्रयोग केले. त्या संशोधनात ही स्थिती कशी निर्माण होते, याविषयी काही गोष्टी त्यांना ज्ञात झाल्या.

**आई:** या बकऱ्या सर्वसाधारण बकऱ्यांपेक्षा शारिरीकदृष्ट्या वेगळ्या असतात का?

**महेश:** काही बाबतीत, निश्चितपणे, या मायोटोनिक बकऱ्या शरीराने रूंद आणि जड असतात. हे सर्व त्यांच्या स्नायुंच्या स्थितीमुळे होतं. नेहमीच्या बकऱ्यांपेक्षा या थोड्या लहान असतात. साधारण १७ ते २५ इंच उंची आणि वजन २७-७९ किलो. नर मात्र ९० किलो चा असतो.

(आकृती क्र.१पहा)



**आई :** चित्रात बघीतल्यावर फरक जाणवतो. आपण नेहमी जी बकरी बघतो, ती वेगळी दिसते.

**महेश :** हो ना ! या मायोटोनिक बकरीच्या डोळ्याच्या खोबण्या बघ. बाहेर आल्यासारख्या दिसतात. डोळेसुद्धा मोठे. जबडाही रूंद. त्यांची शिंगही मोठी. शिंगामधील अंतर जेमतेम १ ते २ इंच. त्यांच्या मानेतील स्नायू दाट असतात. त्यामुळे मान गोलाकार असते. नराच्या माजेजवळची त्वचा सुरकूतलेली असते.

**आई:** बाळा, आणखी काय वैशिष्ट्यं आहेत त्यांची?

**महेश:** आपल्या नेहमीच्या बकऱ्यांपेक्षा या जास्त सावध आणि शांत असतात. या बकऱ्या प्रशिक्षित होऊ शकतात. त्या चांगलं शिकू शकतात. शेत जमीन चांगली नसली किंवा चारा ही उपलब्ध नसेल तरी त्या परिस्थितीशी जुळवून घेतात. यांच्यापासून तयार झालेल्या संकरित बकऱ्या शरीराने मजबुत आणि निरोगी असतात.

**आई:** महेश, तू सगळी माहिती छान सांगितलीस. पण ते तू काय म्हणालास... कॉनजेनिटल मायेटोनिया मध्ये नेमकं काय होतं.? ते स्नायू ताठर का होतांत?

**महेश:** सगळे बारकावे समजले नाहीत. पण एक खरं, या विकाराचा मज्जांस्थेशी काही संबंध नाही. ही स्थिती केवळ स्नायुंशी निगडीत आहे. जेव्हां बकरी गोंधळते, किंवा एखादी हालचाल पटकन करते किंवा अडथळा ओलांडण्याचा प्रयत्न करते, तेव्हां तिचे स्नायू ताठरतात आणि ती पडते.



(आकृती क्र. २ पहा)

**आई:** ते समजलं, पण हे कशामुळे होतं?

**महेश:** या बकऱ्यांच्या स्नायूच्या पेशींच्या पटलामध्ये जे चॅनेल्स असतात, म्हणजे ज्याच्याद्वारे वेगवेगळ्या आयन्सची पेशींमध्ये देवाण घेवाण होते, तर अशा क्लोराइड आयन्सच्या चॅनेल्समध्ये बदल घडतात. ही बदल जणुकातील परिवर्तनामुळे झालेला असतो. त्या विशिष्ट जणुकात ॲलनिनच्या ऐवजी प्रोलिन हे अमिनो आम्लं असतं. या थोड्याशा बदलामुळे स्नायुंततूतील क्लोराइडच्या चॅनेलमधील क्लोराइडचं वहन कमी होतं. त्यामुळे त्यांचे स्नायू ताठरतात.

**आई:** जनुकं केवढी महत्वाची असतात ना, महेश!

**महेश:** पण तुला गंमत माहिती आहे का?

**आई:** कोणती रे!

**महेश:** बकरीचं जे नवजात पिल्लू असतं ना, त्याच्यात पहिले १४ दिवस हा मायोटोनिया दिसून येत नाही. हळूहळू १८ ते १४३ दिवसांत हा प्रतिसाद दिसून येतो. २० ते १७३ स्नायू ताठरू लागतात. आणि मग बकरी पडायला सुरूवात होते.

**आई:** या बकऱ्यांचं मूळ स्थान टेनेसीच ना?

**महेश:** हो, टेनेसीच! मांसाकरिता या बकऱ्यांचं संवर्धन टेनेसीत केलं जायचं. या बकऱ्या वातावरणाशी चटकन जुळवून घेतात तसेच यांना सांभाळणं ही सोपं जातं. कारण त्या उड्या मारू शकत नाहीत.

**आई:** त्यांच्यापासून मांस मिळतं म्हटल्यावर त्या स्थानांतरित केल्या गेल्या असतील ना?

**महेश:** तुझी शंका अगदी रास्त आहे. १९५० च्या दरम्यान त्यांना टेक्सासमध्ये नेण्यात आले. यांच्यापासून संकरीत जाती ही निर्माण करण्यात आला.

**आई:** महेश, सहज माझ्या मनात आलं, ही ती म्हण आहे ना 'शेळी जाते जीवानिशी, खाणारा म्हणतो वातडं; ती यांच्या बाबतीत १०० टक्के लागू होत असेल ना?

**महेश:** अजिबात नाही. जिवंतपणी या बकऱ्या ताठरत असतील, पण त्यांचं मांस मात्र बिल्कूल वातडं नसतं. दर्जाच्या दृष्टिने ते प्रथम क्रमांकावर गणले जाते. ते चांगलंच मऊ आणि चविष्ट असतं.

**आई:** आणखी काय वैशिष्ट्यं त्यांची?

**महेश:** या बकऱ्या स्वत:चं अन्न शोधण्यात वाकबगार असतात. अडथळे पार करणं शक्य नसल्यामुळे त्या शांतपणे कुरणात चरतात; आक्रमक नसतात. इतर बकऱ्यांशी तुलना केली तर या परजीवींना नियंत्रणात ठेवतात.

**आई:** म्हणजे थोडक्यात काय... या बकऱ्यांना पाळणं, लोकांना परवडत असेल.

**महेश:** अगदी नेमकं बोट ठेवलंस... आणि हो... एक सांगायचं राहिलं. त्यांना इंग्रजीत 'फेंटिंग गोट' (Fainting goat) म्हणतात. म्हणतात. पण ते चुकीचं आहे. बकऱ्या बेशुध्द पडत नाहीत. तर स्नायू ताठर झाल्यामुळे खाली पडतात. त्या शुध्दीतच असतात.

**आई:** महेश... आता जेव्हां जेव्हां मी बकऱ्या बघेन ना, तेव्हां ही ताठहरणारी बकरीचं डोळ्यांसमोर येईल.

**महेश:** मजा आली ना, आई?

**आई:** मजा आली खरी. पण पोटात ओरडणाऱ्या कावळ्यांचं काय? चल, आटप. जेवूया शांतपणे...

**(आकृत्या किंवा चित्रे माहिती जालाच्याा सौजन्याने )**

**संपर्क:९३७२९१०३०६**

**मराठी मासिक शिक्षणयात्री** | हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक –शैला नंदकिशोर हजारे **Reg No.**


शाळा बंद शिक्षण सुरू!

Reg No. MAHMAR2015/67226

मासिक शिक्षणयात्री



**आबा महाजन लिखीत, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त आबाची गोष्ट पुस्तक विशेषांक प्रकाशित प्रसंगी मा.विक्रम बांदल (प्रांताधिकारी), मा.आबा महाजन (तहसिलदार), मा.युवराज शिंदे (गटविकास अधिकारी), मा.सचिन पाटील (पत्रकार–दैनिक सकाळ), ईश्वर बोरसे (समाजशक्ती), लक्ष्मण बडगुजर, संदेश हजारे**

Postal Registration No.DHL/557/2021-23

प्रेषक
संपादक –२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

Pragati Arts Shirpur 8421356261

प्रती, ................................................

................................................

................................................